Reg. No. NPCITY/236/2018-20

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ९, अंक १ ] गुरुवार, जानेवारी १९, २०२३/पौष २९, शके १९४४ [पृष्ठे १, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-नागपूर विभागीय पुरवणी

### संकीर्ण अधिसूचना : नेमणुका इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.

भाग १ (असा.) (ना. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. १.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २१(१) अन्वये अधिसूचना**

क्रमांक-अका-जमीन-कावि-१२७-२०२३.—

ज्याअर्थी, तहसीलदार, वर्धा यांनी त्यांचे पत्र क्र. अका-प्र.-१-कावि-५८-२०२३ अन्वये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार अपर जिल्हाधिकारी तथा प्रशासक नवनगरे, नागपूर विभाग यांनी “ हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग ” महामार्गालगत उभारण्यात येणा-या Wayside Amenity करीता प्रकरण क्रमांक ४०-एलएनए-२२-२०२२-२३, मौजा गणेशपूर, ता. जि. वर्धा येथिल सर्वे क्र. ३७ व ३८ मधून आराजी ०.०८३ हे. आर मधील पांधण रस्ता Wayside Amenity ला कुंपण करणे आवश्यक असल्याने मंजूर करण्याबाबत विनंती केलेली असल्याबाबत नमूद केलेले आहे ;

ज्याअर्थी , तहसीलदार, वर्धा यांनी दिनांक ५ जानेवारी २०२३ रोजी मौक्का पाहणी केलेली असून मौक्का पाहणी अंती मौजा गणेशपूर, ता. जि. वर्धा येथिल सर्व्हे क्र. ३७ व ३८ या दोन्ही शेतजमिनीच्या मधातील पांधण रस्त्यामुळे कोणत्याही शेतक-यांचा रस्ता बंद होत नाही. सदर पांधण रस्त्याखालील शासकीय जमीन महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ मर्या. यांना कुंपण करणे आवश्यक असल्याने पांधण रस्त्याचे हक्क नष्ट करण्यास हरकत नसल्याबाबत यांनी अभिप्राय सादर केलेले आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २१ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून मी, राहुल कर्डिले, जिल्हाधिकारी, वर्धा, मौजा गणेशपूर, ता. जि. वर्धा येथिल सर्व्हे क्र. ३७ व ३८ मधून आराजी ०.०८३ हे. आर मधील पांधण रस्ता Wayside Amenity ला कुंपण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २१(१) नुसार नष्ट करण्याचे योजिले आहे.

सदर बाबतीत कुणाला उजर/आक्षेप असल्यास सदर अधिसूचना प्रसिध्दीचे दिनांकापासून ९० दिवसात उजर/आक्षेप उपविभागीय अधिकारी, वर्धा अथवा जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे सादर करावेत. सदर मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/उजर यांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

वर्धा :
दिनांक १८ जानेवारी २०२३.

**राहुल कर्डिले** (भा.प्र.से),
जिल्हाधिकारी, वर्धा.

ना-एक-१ (१७९९).



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.